# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी : २५६०१२६१
फॅक्स : ०२०.२५६९९२३२

गणेशखिंड,
पुणे ४११००७.


संदर्भ: शै.प्रवेश/३६०३ दिनांक : १४/०९/२०१८

**तातडीचे/महत्वाचे**

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/संस्था
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

विषय — आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी १०० टक्के शुल्क घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शिक्षण शुल्काची ५० टक्के रक्कम विद्यार्थ्यास तात्काळ परत करणेबाबत.

संदर्भ — विद्यापीठ परिपत्रक संदर्भ क्र. शै.प्रवेश/३४६७ दि. १०/०९/२०१८

महोदय,

उपरोक्त विषयांस अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, शासनाने ''राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना'' व ''डॉ. पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता योजना'' आणि शासनाच्या अखत्यारितील शिष्यवृत्तीच्या इतर योजनांसाठी पात्र असलेल्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांकडून शिक्षण शुल्काची रक्कम न घेण्याबाबत आदेश दिलेले आहेत याबाबत या कार्यालयाच्या उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये सर्व संबधिताना सूचना दिलेल्या आहेत.

शासनाने दिलेल्या आदेशापूर्वी योजनेसाठी पात्र असलेल्या ज्या विद्यार्थ्यांकडून १०० टक्के शिक्षण शुल्क आकारण्यात आलेले आहे अशा विद्यार्थ्यांना त्यातील ५० टक्के शिक्षण शुल्काची रक्कम परत करणे आवश्यक आहे. याबाबत विद्यापीठाने वेळोवेळी सुचना दिलेल्या आहेत. तथापि, अद्यापही काही महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांनकडून पूर्ण शुल्क आकारणे सुरू ठेवले असल्याबाबत काही संघटनांनी निदर्शनांस आणून दिलेले आहे.

तरी, सर्व महाविद्यालय/संस्था यांना पुन्श्च कळविण्यात येते कि, जे विद्यार्थी वरील शिष्यवृत्तीसाठी पात्र आहेत मात्र, त्यांच्याकडून १०० टक्के शिक्षण शुल्क आकारण्यात आलेले असेल अशा विद्यार्थ्यांना शासनाने दिलल्या आदेशानुसार त्वरीत ५० टक्के शिक्षणशुल्कांची रक्कम परत करण्याबाबत कार्यवाही व्हावी. केलेल्या कार्यवाहीची माहिती विद्यार्थ्यांच्या यादीसह त्वरीत या कार्यालयास सादर करावी.

कळावे,

आपला,
14/9/2018
उपकुलसचिव,
शैक्षणिक प्रवेश विभाग

प्रत :— माहितीसाठी

सहा. कुलसचिव, मा. कुलगुरू यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
सहा. कुलसचिव, मा. प्र—कुलगुरू यांचे कार्यालय, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे